गुरुवार, दि. ७ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २४६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनस्नेहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालन्यात नालीचे घाण पाणी रस्त्यावर

## मामा चौक जुना मोंढा मार्गाला तलावाचे स्वरूप; पालिकेचा दुटप्पी कारभार चव्हाट्यावर

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील अतिवर्दळीचा मानला जाणारा मामा चौक ते जुना मोंढा हा मार्ग सध्या नरकयातनांचा मार्ग ठरत आहे. एका नवीन बांधकामाच्या मलब्यामुळे नाली तुंबली असून, सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत आहे. या घाण पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, सर्वसामान्यांवर दंडाचा बडगा उगारणारी महानगरपालिका धनदांडग्या बांधकामदारांपुढे हतबल झाली आहे की काय? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या मार्गावरील एका जुन्या इमारतीचे पाडकाम करून त्याठिकाणी नवीन बांधकाम सुरू आहे. या बांधकामातून निघालेले डब्बर, विटांचे तुकडे आणि माती थेट बाजूच्या नालीत टाकण्यात आली आहे. यामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णतः बंद झाला असून, नालीतील काळेकुट्ट घाण पाणी आता रस्त्यावरून वाहत आहे. हा रस्ता सध्या एखाद्या घाण पाण्याच्या तलावासारखा दिसत असून, वाहनधारकांना कसरत करत मार्ग काढावा लागत आहे.

पादचाऱ्यांच्या अंगावर घाण पाण्याचे कारंजे

हा मार्ग नेहमीच वाहनांनी गजबजलेला असतो. रस्त्यावर साचलेल्या सांडपाण्यातून जेव्हा वाहने वेगाने जातात, तेव्हा ते घाण पाणी थेट पादचारी, शाळकरी मुले आणि महिलांच्या अंगावर उडत आहे. यामुळे नागरिकांना मनस्ताप आणि अपमानास्पद परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. ''शहराच्या मुख्य भागात चालणे म्हणजे शिक्षा झाली आहे,'' अशा शब्दांत स्थानिकांनी आपला संताप व्यक्त केला.

पालिका प्रशासनाचे अर्थपूर्ण मौन?

प्रत्येक प्रभागात स्वच्छता निरीक्षक आणि संबंधित वॉर्ड अधिकारी नेमलेले असतानाही, गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला हा प्रकार प्रशासनाला का दिसत नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. महानगरपालिकेचे अधिकारी या मार्गावरून फिरकत नाहीत की जाणूनबुजून याकडे दुर्लक्ष करत आहेत? अशी शंका आता व्यक्त केली जात आहे.

कायदा फक्त गरिबांसाठीच?

या प्रकरणात नागरिकांनी प्रशासनाच्या दुटप्पी भूमिकेवर कडक ताशेरे ओढले आहेत. एखाद्या सामान्य नागरिकाने रस्त्यावर कचरा टाकला किंवा किरकोळ चूक केली तर पालिका लगेच दंड वसूल करते. मात्र, धनदांडग्या बांधकामदाराने संपूर्ण नाली बुजवून रस्ता खराब केला असतानाही त्याच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. ''प्रशासन बांधकामदारांकडून लक्ष्मी घेऊन त्यांना मोकळीक देत आहे का?'' असा थेट आरोप आता नागरिक करत आहेत.

पावसाळा तोंडावर; अनर्थाची भीती

लवकरच पावसाळा सुरू होणार असून, त्यापूर्वीच नालीची ही अवस्था असेल तर पहिल्याच पावसात संपूर्ण जुना मोंढा परिसर जलमय होण्याची भीती आहे. साचलेल्या पाण्यामुळे डासांचे




प्रमाण वाढले असून डेंग्यू, मलेरियासारख्या आजारांची भीती व्यक्त होत आहे.

महानगरपालिकेने तातडीने या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित बांधकामदारावर दंडात्मक कारवाई करावी आणि नालीची साफसफाई करून रस्ता मोकळा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. जर येत्या दोन दिवसांत ही परिस्थिती सुधारली नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्रस्त नागरिकांनी दिला आहे.

# अश्लील फोटो काढून तरुणीवर अत्याचार; धर्मांतरासाठी दबाव आणणाऱ्या दोघांना बेड्या

**भोकरदन । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील पारध पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक अत्यंत धक्कादायक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. एका तरुणीचे अश्लील फोटो काढून, ते व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. इतकेच नव्हे तर पीडितेवर नमाज पढण्यासाठी आणि बुरखा घालण्यासाठी सक्ती करत धर्मांतराचा दबाव टाकल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह त्याच्या भावाला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील मुख्य आरोपी शेख इम्रान शेख हबीब याने पीडित तरुणीचे काही अश्लील फोटो गुपचूप काढले होते. हे फोटो सोशल मीडियावर टाकून बदनामी करण्याची धमकी देऊन त्याने तरुणीला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. याच भीतीचा गैरफायदा घेत आरोपीने तरुणीला वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केले.

धर्मांतरासाठी मानसिक व शारीरिक छळ

पीडितेने पोलिसांत दिलेल्या तक्रारीत अत्यंत धक्कादायक खुलासे केले आहेत. अत्याचार करण्यासोबतच आरोपीने तिला तिची धार्मिक ओळख बदलण्यासाठी भाग पाडले. तिला सक्तीने नमाज पढायला लावणे आणि बुरखा परिधान करण्यासाठी मानसिक व शारीरिक त्रास देणे, अशा प्रकारे धर्मांतरासाठी दबाव टाकण्यात येत होता. या छळामुळे पीडिता प्रचंड दहशतीखाली होती.

पोलीस कारवाईः चौघांवर गुन्हा, दोघे अटकेत

अखेर पीडित तरुणीने हिंमत एकवटून पारध पोलीस ठाणे गाठले आणि आपबिती




सांगितली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तत्काळ कारवाई करत मुख्य आरोपी शेख इम्रान शेख हबीब याच्यासह त्याच्या कुटुंबातील इतर तीन सदस्यांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आतापर्यंत मुख्य आरोपी आणि त्याच्या भावाला अटक केली असून, इतर दोन संशयितांचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे.

परिसरात तीव्र संताप

या घटनेची माहिती पसरताच भोकरदन तालुका आणि पारध परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, अशा विकृत मानसिकतेच्या गुन्हेगारांना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

पोलीस अधीक्षकांचा इशारा

या प्रकरणाचा तपास सखोलपणे सुरू असून कोणताही दोषी सुटणार नाही, असे आश्वासन पोलीस प्रशासनाकडून देण्यात आले आहे. गुन्हेगारांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, जेणेकरून भविष्यात अशा घटनांना पायबंद बसेल, असे पोलीस अधीक्षकांनी स्पष्ट केले आहे.

# जिल्हाधिकारी यांनी घेतला महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्या कामकाजाचा आढावा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जिल्ह्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांचा व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांना गावपातळीवरील समन्वय अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.

बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकारी यांना नागरिकाभिमुख आणि पारदर्शक प्रशासनासाठी कटिबद्ध राहण्याचे निर्देश दिले. विहित कालमर्यादेमध्ये सर्व प्रकारचे फेर फारची निर्गती होईल याची दक्षता घ्यावी. कार्यालयाच्या दर्शनी भागात उपस्थिती व भेटीचे वेळापत्रक स्पष्टपणे नमूद करण्याच्या सूचना दिल्या. तसेच तालुका किंवा जिल्हास्तरीय बैठकीसाठी बाहेर जाणार असल्यास संबंधित गावकऱ्यांना पूर्वकल्पना देणे आवश्यक असल्याचे सांगितले.




महसूल संबंधित प्रकरणांमध्ये विलंब होऊ नये यासाठी फ ेरफारसारखी सर्व कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला. कार्यालयीन कामकाजात कोणत्याही खाजगी व्यक्तीचा हस्तक्षेप असू नये, असे स्पष्ट निर्देश दिले.

यासोबतच, शासकीय वापरातील युजर आयडी आणि डिजिटल स्वाक्षरी कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यक्तींना देऊ नयेत, अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशा सूचना दिल्या. नागरिकांकडून शासनाने निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही,

पान २ वर

# कोरड्या विहिरीत अडकलेल्या कोल्ह्याचे ५ दिवसांनंतर यशस्वी रेस्क्यू

## युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया व वन विभागाची संयुक्त कारवाई

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** एका कोरड्या विहिरीत अडकलेल्या कोल्ह्याचे युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया () तर्फे यशस्वी रेस्क्यू करण्यात आले. स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार सदर कोल्हा सुमारे चार ते पाच दिवसांपासून त्या विहिरीमध्ये अडकलेला होता या संदर्भात कॉल प्राप्त होताच च्या ॲनिमल रेस्क्यू टीमने तातडीने घटनास्थळी धाव घेतली ॲनिमल रेस्क्यू हेड वैभव लाखोले यांच्या नेतृत्वाखाली, मॅनेजिंग डायरेक्टर दुर्गेश बनकर व डायरेक्टर ज्ञानेश्वर शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण ऑपरेशन राबविण्यात आले परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता सर्वप्रथम वन विभागाशी संपर्क साधून त्यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्ध पद्धतीने रेस्क्यू मोहीम सुरू करण्यात आली. विहिरीची खोली, कोल्ह्याची भीतीग्रस्त अवस्था आणि मर्यादित जागा या सर्व अडचणींवर मात करत टीमने अत्यंत काळजीपूर्वक आणि संयमाने काम केले अखेर कोणतीही जीवितहानी न होता कोल्ह्याला सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले. त्यानंतर वन विभागाच्या सल्ल्यानुसार व त्यांच्या

पान २ वर



# पगाराविना विकासाचा पाया? JJM–SBMG कर्मचाऱ्यांचा सवाल; महिनोंमहिने मानधन प्रलंबित

## हजारो कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट; असहकार सुरू, प्रधान सचिव कार्यालयासमोर घरणे धरणार

**जालना । प्रतिनिधी -** ग्रामीण महाराष्ट्रात स्वच्छता आणि पाणीपुरवठ्याच्या योजनांना यश मिळवून देणाऱ्या जल जीवन मिशन () आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) () अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांवर सध्या गंभीर आर्थिक संकट ओढवले असून महिनोनमहिने मानधन न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे .''पगाराविना विकासाचा पाया कसा उभा राहील?'' असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

याबाबत असे की, जल जीवन मिशन अंतर्गत कर्मचारी सुमारे ५-६ महिन्यांपासून, तर स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कर्मचारी ३-४ महिन्यांपासून मानधनाविना कार्यरत आहेत. मागील ७-८ महिन्यांत जिल्हा व तालुका स्तरावरील कर्मचाऱ्यांना केवळ एकदाच मानधन अदा झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे घरभाडे, शिक्षण, आरोग्य व दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाले आहे.



राज्यभरातील हजारो कंत्राटी कर्मचारी या परिस्थितीचा सामना करत आहेत.या कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण योगदानामुळे राज्यात आतापर्यंत ३८,८०५ गावे ''ओडीएफ प्लस'' तर १४,४७२ गावे ''हर घर जल'' म्हणून घोषित झाली आहेत. एका बाजूला राज्याने राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले असताना, दुसऱ्या बाजूला अभियानात उल्लेखनीय काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आर्थिक असुरक्षितता वाढत असल्याचे चित्र समोर येत आहे.दरम्यान, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रलंबित मानधन अदा करण्याचे आदेश दिले होते, तर दि. २५ मार्च २०२५ रोजी राज्य मानवाधिकार आयोगानेही तत्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले होते. तरीही अंमलबजावणीतील विलंबाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

दि. १२ फेब्रुवारी २०२६, २० मार्च २०२४ व २५ मार्च २०२५ या प्रमुख टप्प्यांनंतरही प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रलंबित असल्याचे समोर येत आहे.

कृती समितीच्या म्हणण्यानुसार, विभागीय पातळीवर अपेक्षित गती दिसून येत नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर होत आहे. योजनांची अंमलबजावणी सुरू असताना, त्या राबवणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी स्थिर वेतन व्यवस्था नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. प्रशासकीय स्तरावर समन्वयाचा अभाव जाणवत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

क्षेत्रीय कामकाज, डेटा अहवाल व जनजागृती उपक्रमांवरही या परिस्थितीचा परिणाम होऊ लागल्याचे निदर्शनास येत आहे.

तसेच, संबंधित वित्तीय प्रस्ताव अद्याप मंजुरीच्या प्रक्रियेत असून निधी उपलब्ध होण्यास विलंब होत आहे. त्यानंतर प्रणालीअंतर्गत निधी वितरित झाल्यानंतरही प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यासाठी अतिरिक्त वेळ लागत असल्याचे सांगितले जात आहे.

या पार्श्वभूमीवर, नियमित वेतन वितरणासाठी स्वतंत्र ''कंत्राटी कर्मचारी मानधन शिर्ष'' निर्माण करणे व स्थिर निधी वितरण यंत्रणा उभी करणे हा दीर्घकालीन उपाय असल्याची मागणी जोर धरत आहे.

मुख्य मागण्या प्रलंबित मानधन तात्काळ अदा करणे, स्वतंत्र ''कंत्राटी कर्मचारी मानधन'' शिर्ष निर्माण करणे, आकृतीबंध व सेवा-सुरक्षेबाबत तातडीने निर्णय घेणे.

दरम्यान, १०वी व १२वीच्या निकालानंतर प्रवेश प्रक्रिया सुरू असताना, मानधन न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांना आपल्या पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च भागवणे कठीण होत असल्याची

पान २ वर

## संपादकीय पान

### दोन राष्ट्रगीतांचे जनक

भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची जयंती. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते. रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबदद्ल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते. रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने ''सर'' ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

### महाराष्ट्र औद्योगिक संबंध नियम २०२६ मसुद्यावर हरकती व सूचनाची मागणी

**जालना -** राज्य शासनाने कामगार क्षेत्रातील कायदे अधिक सुलभ, पारदर्शक आणि प्रभावी करण्याच्या उद्देशाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत 'महाराष्ट्र औद्योगिक संबंध नियम, २०२६' या नवीन नियमावलीचा मसुदा प्रसिद्ध केला आहे. केंद्र शासनाच्या 'औद्योगिक संबंध संहिता, २०२०' आणि 'वेतन संहिता, २०१९' यांच्या धर्तीवर ही नियमावली तयार केली आहे.ही मसुदा नियमावली महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच कामगार विभागाच्या संकेतस्थळावर 'कायदा व नियम' (ॲक्ट अँड रुल्स) या विभागात सर्वसामान्य नागरिक, उद्योजक आणि कामगार संघटनांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पान १ वरुन

### जिल्हाधिकारी यांनी ...

याची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याचे आदेशही देण्यात आले.

महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, जबाबदार आणि जनहिताभिमुख करण्यासाठी दिलेल्या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यावेळी केले

### कोरड्या विहिरीत ...

देखरेखीखाली त्या कोल्ह्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात जंगलात सुखरूप सोडण्यात आले. वन्यजीवांचे पर्यावरणातील महत्त्व कोल्ह्यासारखे वन्यप्राणी पर्यावरणातील अन्नसाखळीचा महत्त्वाचा भाग आहेत. ते उंदीर कीटक यांसारख्या लहान प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवून शेती व परिसंस्थेचे संतुलन राखण्यास मदत करतात. अशा प्राण्यांचे संरक्षण करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे पर्यावरण आणि मानवजीवनाचे रक्षण करणे होय जनतेसाठी आवाहन युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया ही संस्था सातत्याने वन्यजीव संरक्षण, प्राणी बचाव, शिक्षण आणि पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी .. या संकेतस्थळाला भेट द्यावी तसेच कुठेही अडचणीत सापडलेले प्राणी आढळल्यास युनायटेड ग्लोबल फ ेडरेशन इंडिया च्या ॲनिमल रेस्क्यू पोर्टलचा वापर करून तत्काळ मदत मिळवता येऊ शकते, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे या यशस्वी मोहिमेमुळे स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त करत युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया टीमच्या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक केले आहे.

### पगाराविना विकासाचा ...

भावना व्यक्त करण्यात आली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांनी २० एप्रिल २०२६ पासून राज्यव्यापी असहकार आंदोलन सुरू केले असून, अहवाल सादरीकरण व बैठकींमध्ये सहभाग मर्यादित केला आहे. पुढील टप्प्यात प्रधान सचिव कार्यालयासमोर धरणे व त्यानंतर राज्यस्तरीय आंदोलनाचा आराखडा तयार करण्यात येत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

आगामी काही दिवसांत ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# महाराष्ट्र अत्याचाराच्या छायेत

संतांची भूमी आणि पुरोगामी विचारांचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची प्रतिमा सध्या काहीशी काळवंडू लागली आहे. गेल्या काही महिन्यांत राज्याच्या विविध भागांतून समोर येणाऱ्या महिला, बालके आणि शोषितांवरील अत्याचाराच्या घटनांनी संपूर्ण समाजमन सुन्न झाले आहे. सुरक्षिततेच्या दाव्यांना छेद



देणाऱ्या या घटनांमुळे आता विचार करण्याची वेळ आली आहे की, आपला महाराष्ट्र खरोखरच सुरक्षित आहे का ? घटनेचे गांभीर्य आणि वाढती गुन्हेगारीच्या संदर्भात बदलापूर असो, पुणे, मालेगाव असो किंवा ग्रामीण भागातील दुर्गम गावे असोत, अत्याचाराचे लोण सर्वत्र पसरताना दिसत आहे. केवळ शारीरिक अत्याचारच नव्हे, तर मानसिक छळ आणि सायबर क्राईमच्या माध्यमातून होणारी फसवणूकही चिंतेचा विषय ठरत आहे.

महाराष्ट्रात अलीकडच्या काळात काही अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक घटना घडल्या आहेत, विशेषतः पुण्यातील नसरापूर आणि चाकण परिसरातील घटनांमुळे संपूर्ण राज्य हादरले आहे.

आपण २१ व्या शतकात वावरत असताना, विज्ञानाने प्रगती केली असली तरी सामाजिक सुरक्षिततेच्या पातळीवर आपण अजूनही मागे आहोत का, असा प्रश्न पडतो. दररोज वर्तमानपत्र उघडले की महिला आणि लहान मुलींवर होणाऱ्या अत्याचारांच्या बातम्या मन सुन्न करतात. सद्यस्थितीत आणि वाढत्या घटना मुळे आजच्या काळात अल्पवयीन मुलींना घर, शाळा किंवा सार्वजनिक ठिकाणीही सुरक्षित वाटत नाही. मुंबई, पुणे, मालेगाव, आणि छत्रपती संभाजीनगर,अमरावती, जालना, सारख्या अनेक शहरांमधून मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचारांच्या घटना वारंवार समोर येत आहेत. अनेकदा अत्याचार करणारे व्यक्ती पीडितेच्या ओळखीचे किंवा नात्यातीलच असल्याचे समोर आले आहे, जे समाजाच्या नैतिक अध:पाताचे लक्षण आहे.

पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे १ मे (महाराष्ट्र दिन) च्या सुमारास एका ४ वर्षीय चिमुरडीवर ६५ वर्षीय नराधमाने लैंगिक अत्याचार करून तिची दगडाने ठेचून हत्या केली. या घटनेनंतर आरोपीने तिचा मृतदेह लपवण्याचाही प्रयत्न केला होता. स्थानिक ग्रामस्थांनी या घटनेचा तीव्र निषेध करत आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली असून संपूर्ण नसरापूर कडकडीत बंद ठेवण्यात आले होते.

नसरापूरची घटना ताजी असतानाच, चाकण परिसरातील महाळुंगे येथे एका ३ वर्षांच्या मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याची हत्या केल्याची दुसरी धक्कादायक घटना समोर आली आहे. आरोपीने मुलाचा मृतदेह एका सुटकेसमध्ये भरून तो निर्जनस्थळी फेकून दिला होता.

बदलापूर प्रकरणात एका शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली होती. मालेगावमध्ये ३ वर्षांच्या मुलीवर आणि पुण्यात ४ वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनांनी महाराष्ट्र हादरला आहे. एप्रिल २०२६ मध्ये एका १९ वर्षीय तरुणाने १८० हून अधिक अल्पवयीन मुला-मुलींचे शोषण केल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला आहे.

नाशिकमध्ये एप्रिल २०२६ मध्ये एका नामांकित बहुराष्ट्रीय आयटी कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांवर झालेल्या लैंगिक आणि मानसिक अत्याचाराचे खळबळजनक प्रकरण समोर आले आहे. या प्रकरणाच्या सखोल तपासासाठी विशेष तपास पथकाची () नियुक्ती करण्यात आली आहे.या प्रकरणात आतापर्यंत एकूण ९ गुन्हे () दाखल झाले असून, त्यात ८ महिला आणि १ पुरुष पीडित आहेत.पीडित महिलांनी लैंगिक छळ, विनयभंग आणि मानसिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. यासोबतच त्यांना धर्मांतरासाठी प्रवृत्त करणे, विशिष्ट धार्मिक पद्धतींचे पालन करण्यास भाग पाडणे आणि धार्मिक भावना दुखावल्याचे आरोपही आहेत. पोलिसांनी या प्रकरणात कंपनीचे काही टीम लीडर्स आणि पुण्यातील एका महिला एचआर () व्यवस्थापिकेसह एकूण ७ संशयितांना अटक केली आहे. स्वयंघोषित महाराज अशोक खरात प्रकरण मार्च २०२६ मध्ये नाशिकमध्ये ६७ वर्षीय स्वयंघोषित महाराज अशोक खरात याला २७ वर्षीय महिलेवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे.या प्रकरणाचा तपासही कडे सोपवण्यात आला असून, त्यात नरबळी आणि जादूटोण्यासारखे गंभीर पैलू असल्याचे संशय व्यक्त करण्यात आला आहे.या प्रकरणांचा तपास सध्या प्रगतीपथावर आहे.

नऊ वर्षाच्या मुली समोर अश्लील चाळे करताना सहाय्यक पोलीस उपायुक्ताला अटक केल्याची घटना मुंबईत घडली ती वाचण्यात आली. वरळी परिसरात ही घटना घडली.रक्षकच झाला भक्षक असे म्हणावे लागतेय.

महत्त्वाचे कायदेशीर आणि सामाजिक पैलू:

शक्ती कायदा ( ): अशा क्रूर गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षेची तरतूद असलेला शक्ती कायदा महाराष्ट्रात लवकरात लवकर लागू करावा, अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरत आहे.

या दोन्ही घटनांमधील आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, तपास सुरू आहे. आरोपींना जलदगती न्यायालयात ( ) खटला चालवून कठोर शासन करण्याची मागणी केली जात आहे.

या घटनांमुळे महिला आणि बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या () आकडेवारीनुसार, महिलांवरील अत्याचाराच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. यातही सर्वात भयावह बाब म्हणजे, अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार आणि त्यांची वाढती संख्या भयानक आहे.कायद्याचा धाक उरला आहे का? शक्ती कायद्यासारखे कडक कायदे कागदावर आले असले, तरी त्यांची अंमलबजावणी किती प्रभावीपणे होते, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.

पोलिसांवरील कामाचा ताण, तपास यंत्रणांमधील उणिवा आणि न्यायालयीन प्रक्रियेत होणारा विलंब यामुळे गुन्हेगारांचे धाडस वाढत असल्याचे चित्र दिसत आहे.

पोलसामधील नितीमत्ता कमी होताना दिसत आहे.

अकोला.. आरोपी महिलेकडे शरीर सुखाची मागणी, अल्पवयीन मुलीसमोर अश्लील चाळे, वरळी परिसरातील घटना. या घटनावरून ते स्पष्ट दिसून येत आहे.

जोपर्यंत गुन्हेगाराला कायद्याची आणि त्वरित मिळणाऱ्या शिक्षेची भीती वाटत नाही, तोपर्यंत अशा प्रवृत्तींना आळा बसणे कठीण आहे.

सामाजिक मानसिकतेत बिघाड निर्माण झाला आहे. अत्याचाराच्या वाढत्या घटनांमागे केवळ कायद्याची कमतरता नसून, सामाजिक मानसिकतेत झालेला बदलही कारणीभूत आहे. अनेक गोष्टी मुळे माणसाचे मनातील अस्वस्थता वाढली आहे. कदाचित ती अस्वस्थता त्याला विकृतीकडे घेऊन जात असावी.



इंटरनेटचा अतिवापर, माध्यमातून विकृत साहित्याची सहज उपलब्धता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास यामुळे तरुण पिढी भरकटत आहे.वयस्करां मधली वासनांधताही वाढत असल्याचे दिसून येत आहे. स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन जोपर्यंत सन्मानाचा होत नाही, तोपर्यंत घराबाहेरच काय, तर घरातही महिला सुरक्षित राहतील याची खात्री देता येत नाही.

उपाययोजना काय असाव्यात?

१. पोलिस गस्त आणि सीसीटीव्ही: वर्दळीच्या ठिकाणी आणि शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात पोलिसांची गस्त वाढवणे आवश्यक आहे.

२. द्रुतगती न्यायालये ( ): अशा प्रकरणांचा निकाल लवकरात लवकर लागावा जेणेकरून समाजात एक कठोर संदेश जाईल.

३. शालेय शिक्षण: शालेय स्तरापासूनच मुला-मुलींना गुड टच-बॅड टच आणि नैतिक मूल्यांचे शिक्षण दिले पाहिजे.

४. सामाजिक बहिष्कार: गुन्हेगारांना राजकीय किंवा सामाजिक आश्रय न देता, त्यांच्यावर कडक सामाजिक बहिष्कार टाकायला हवा.

महाराष्ट्र हे केवळ एक राज्य नसून, तो एक विचार आहे. छ.शिवाजी महाराज, शाहू महाराज-म.फ ुले-बाबासाहेबआंबेडकर, सावित्रीबाई, गोखले, आगरकर, लो.टिळक, यांचा वैचारिक वारसा असलेल्या राज्यात जर महिला आणि बालके सुरक्षित नसतील, तर प्रगतीचे सर्व आकडे फोल आहेत. केवळ सरकार किंवा पोलिसांना दोष देऊन चालणार नाही, तर प्रत्येक नागरिकाने सतर्क राहून आपल्या परिसरातील अशा प्रवृत्तींना ठेचणे गरजेचे आहे. तरच अत्याचाराची ही छाया दूर होवून उद्याचा महाराष्ट्र सुरक्षित आणि तेजस्वी असेल.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जळगांव.**
**८९९९५६६९१७**

## अंबडमधील बालिकेवरील अत्याचार प्रकरणात आयोग आक्रमक; जिल्हा प्रशासनाला तातडीचा इशारा

### अटक न झाल्याने संताप; पीडित कुटुंबाच्या आंदोलनाची दखल

**जालना । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील १३ वर्षीय अल्पवयीन बालिकेवरील अत्याचार प्रकरणात महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने कठोर भूमिका घेत जिल्हा प्रशासनाला खणखणीत इशारा दिला आहे. या प्रकरणाची स्वतः हून दखल घेत आयोगाने जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना तात्काळ सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, संबंधित प्रकरणात आरोपीविरुद्ध अद्याप ठोस कारवाई न झाल्याने संतप्त झालेल्या पीडित कुटुंबाने उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. विशेष म्हणजे, दबाव आणि न्याय न मिळाल्याच्या नैराश्यातून पीडित बालिकेच्या वडिलांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याची गंभीर बाब समोर आल्याने या प्रकरणाने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे सचिव पंकज देवरे यांनी जिल्हा प्रशासनाला कठोर शब्दांत निर्देश दिले आहेत. सदर प्रकरणात आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली, याचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल तातडीने सादर करावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. जर कोणतीही ठोस कारवाई झाली नसेल, तर त्यामागील कारणे व संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली, याची माहितीही देणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय, या गंभीर गुन्ह्यात बालकांचे संरक्षण करणाऱ्या कायद्यांनुसार कारवाई झाली आहे का, याचीही सविस्तर माहिती मागवण्यात आली आहे. विशेषतः अल्पवयीनांवरील लैंगिक अपराध प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे का, तसेच बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या इतर कायद्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे करण्यात आली आहे का, याचा खुलासा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पीडित बालिकेच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने

### आजच अहवाल सादर करण्याचे आदेश

कोणती ठोस पावले उचलली, याबाबतही आयोगाने स्पष्ट अहवाल मागितला आहे. बालिकेच्या आरोग्य, समुपदेशन व सुरक्षिततेसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे, याची माहिती देणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. आयोगाने स्पष्ट इशारा देताना नमूद केले आहे की, निर्धारित वेळेत अहवाल सादर न केल्यास संबंधितांवर प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच या प्रकरणात आयोग स्वतः सुनावणी घेण्याचा अधिकार वापरू शकतो, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या घटनेमुळे जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. अल्पवयीन मुलीवर अत्याचार होतो, आरोपी मोकाट फिरतो आणि कुटुंब न्यायासाठी रस्त्यावर उतरते, ही परिस्थिती अत्यंत लाजिरवाणी आहे, अशा तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. दरम्यान, या प्रकरणात आता तरी प्रशासन झोपेतून जागे होणार का, आरोपीला अटक होऊन पीडितेला न्याय मिळणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. आयोगाच्या कडक भूमिकेमुळे पुढील काही तासांत या प्रकरणात ठोस घडामोडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

० ते १८ वयोगटातील प्रत्येक बालकाचे वैधानिक हक्क अबाधित राखणे ही केवळ जबाबदारी नसून कर्तव्य आहे.



बालकांवरील अन्याय, अत्याचार, शोषण किंवा कोणत्याही प्रकारचे उत्पीडन अजिबात सहन केले जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये कोणतीही तडजोड मान्य नाही. संबंधित यंत्रणांनी तात्काळ, पारदर्शक आणि संवेदनशील पद्धतीने कारवाई करणे अत्यावश्यक आहे. जर कोणत्याही स्तरावर चालढकल झाली किंवा गुन्हेगारांना आडवळणाने संरक्षण देण्याचा प्रयत्न झाला, तर कठोर कायदेशीर कारवाईची शिफारस करण्यात येईल. बालकांचे संरक्षण, सन्मान आणि पुनर्वसन हीच आमची सर्वोच्च बांधिलकी आहे.

**- डॉ. संजय लाखेपाटील**
**सदस्य, महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग**

## गांधी चमन येथील दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दिव्यांग प्रमाणपत्र सुविधा सुरू करा

### युवा सेनाचे शुभम टेकाळे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या गांधी चमन येथील दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दिव्यांग प्रमाणपत्र काढण्याची सुविधा सुरू करण्यात यावी, अशी मागणी युवा सेना लोकसभा सचिव शुभम टेकाळे यांनी केली आहे.



याबाबत माहिती देताना शुभम टेकाळे म्हणाले की, गांधी चमन परिसर हा रेल्वे स्थानक आणि बस स्थानकाच्या मध्यवर्ती ठिकाणी येत असल्यामुळे जिल्ह्यातील तसेच ग्रामीण भागातून येणाऱ्या दिव्यांग नागरिकांना येथे पोहोचणे सोयीचे ठरते. सध्या दिव्यांग प्रमाणपत्रासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात जावे लागत असून बस स्थानक ते रुग्णालय प्रवासासाठी दिव्यांगांना ५० ते १०० रुपये खर्च करावे लागत आहेत. तर बस स्थानक ते गांधी चमन परिसरासाठी केवळ १० ते २० रुपये खर्च येत असल्याने आर्थिकदृष्ट्याही ही सुविधा लाभदायक ठरणार आहे. गांधी चमन येथील दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दर बुधवारी दिव्यांग प्रमाणपत्र काढण्याची प्रक्रिया उपलब्ध करून दिल्यास मोठ्या प्रमाणावर दिव्यांग नागरिकांना त्याचा फायदा होईल. अनेक दिव्यांगांना लांब अंतराचा प्रवास करणे कठीण जात असल्याने मध्यवर्ती ठिकाणी सुविधा उपलब्ध होणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रशासनाने दिव्यांग नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन तातडीने गांधी चमन येथील पुनर्वसन केंद्रात दिव्यांग प्रमाणपत्र सुविधा सुरू करावी, अशी मागणीही शुभम टेकाळे सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी केली आहे.

झाडे लावा झाडे जगवा

युवा आदर्श | जालना | गुरुवार, दि ७ मे २०२६ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com | ३

## टाटा मेमोरियल रुग्णालयात अत्याधुनिक निदान सुविधांना बळकटी देण्यात येणार - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई** - देशातील अग्रगण्य कर्करोग उपचार व संशोधन केंद्र असलेल्या टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे निदान व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी कॉर्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत महत्त्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक स्वयंचलित ट्यूब लेबलिंग व बारकोडिंग प्रणाली (एपीटीएल) या तीन प्रगत यंत्रणांची यशस्वी स्थापना करण्यात आली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या नव्या प्रणालींमुळे नमुन्यांचे अचूक लेबलिंग आणि बारकोडिंग स्वयंचलित पद्धतीने होणार असून, मानवी त्रुटी कमी करण्यास मोठी मदत होणार आहे. परिणामी, निदान प्रक्रियेत अचूकता वाढणार असून रुग्णांच्या सुरक्षिततेत लक्षणीय सुधारणा होईल. तसेच, रुग्णालयातील क्लिनिकल वर्कफ्लो अधिक सुलभ आणि कार्यक्षम होणार आहे.

विशेषतः कर्करोगासारख्या गंभीर आजारांमध्ये निदानातील अचूकता आणि वेळेवर उपचार अत्यंत महत्त्वाचे असतात. एपीटीएल प्रणालीमुळे नमुने हाताळण्यातील गोंधळ, विलंब आणि चुकीची ओळख यांसारख्या समस्या मोठ्या प्रमाणात कमी होतील. त्यामुळे डॉक्टरांना अधिक विश्वासार्ह अहवाल मिळून उपचार प्रक्रियेत गती येईल.

जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवांकडे आणखी एक पाऊल

या उपक्रमामुळे रुग्णालयातील प्रयोगशाळा व्यवस्थापन आधुनिक तंत्रज्ञानाशी सुसंगत होऊन, जागतिक दर्जाच्या आरोग्य सेवांकडे आणखी एक पाऊल टाकले गेले आहे. सीएसआर च्या माध्यमातून अशा प्रकारच्या अत्याधुनिक सुविधांची उभारणी केल्याने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यास मोठी मदत होत आहे. या उपक्रमासाठी इंडियन ऑइल कंपनीने सहकार्य केले आहे त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आभार व्यक्त केले.

याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की ''टाटा मेमोरियल रुग्णालयात उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक एपीटीएल प्रणालीमुळे निदान प्रक्रियेत अचूकता, पारदर्शकता आणि गती वाढणार आहे. रुग्णांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची ही दिशा महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. सीएसआर च्या माध्यमातून आरोग्य क्षेत्रात होणारी ही गुंतवणूक भविष्यात अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्यासाठी मोलाची ठरेल.''

### जालना मर्चंट बँक घोटाळा

# भोकरदन शाखा व्यवस्थापकाला अटक; आरोपींना ६ दिवसांची पोलीस कोठडी

जालना । प्रतिनिधी - जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत झालेल्या कोट्यवधींच्या कर्ज घोटाळ्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. या घोटाळ्यातील सहभागावरून भोकरदन शाखेचे व्यवस्थापक नटवर सत्यनारायणजी दायमा (वय ४७) यांना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांना ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य आणि ठेवीदारांचे हित लक्षात घेता, पोलिसांनी आता या गुन्ह्यात एमपीआयडी () कायद्याची कलमे वाढवली आहेत.

**घोटाळ्याचे स्वरूप आणि कारवाई**

जालना मर्चंट बँकेत बनावट कागदपत्रे आणि वेअर हाऊसच्या पावत्यांच्या आधारे तब्बल १७७ बनावट खातेदारांच्या नावे २३ कोटी ३३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले होते. याप्रकरणी चंदनझीरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या () विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांच्या आदेशानुसार आर्थिक गुन्हे शाखेने या तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान मुख्य सूत्रधार रायचंद कुरंगळ याला यापूर्वीच अटक करण्यात आली होती. त्यानंतर निलेश्वर भोसले, रामेश्वर जाधव, ज्ञानेश्वर जाधव, सुधाकर ठोंबरे आणि गणेश साबळे यांनाही बेड्या ठोकण्यात आल्या होत्या.

**बँक मॅनेजरचा सहभाग निष्पन्न**

तपासादरम्यान मिळालेले पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबावरून, भोकरदन शाखेचे व्यवस्थापक नटवर दायमा यांचा या कटात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी अधिकारांचा गैरवापर करून बनावट कर्ज वितरणात मदत केल्याचे समोर आले आहे. तसेच फिर्यादी राजेंद्र टोकशा यांनाही या प्रकरणात अटक करण्यात आली आहे.

**एमपीआयडी कायदा लागू**

आरोपींनी बँकेतील सामान्य नागरिकांच्या ठेवींचा पैसा बोगस वेअर हाऊस कर्जाच्या माध्यमातून वळवला आहे. ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी पोलिसांनी या गुन्ह्यात महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम ( ) कलम ३, ४ आणि ५ चा समावेश केला आहे. यामुळे आता ठेवीदारांचे पैसे परत मिळण्याच्या दृष्टीने या कारवाईला कायदेशीर महत्त्व प्राप्त झाले आहे.

**बीड शाखेतील फसवणुकीचे कनेक्शन**

आरोपींनी अशाच प्रकारे पुर्णवादी नागरी सहकारी बँक (बीड, शाखा गांधी चमन) येथेही ८ कोटी १३ लाख रुपयांचा अपहार केल्याचे उघड झाले आहे.

याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हा दाखल असून, तेथील ७ आरोपींची पोलीस कोठडीही न्यायालयाने दोन दिवसांनी वाढवून दिली आहे.

ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, प्रभारी पोलीस उपअधीक्षक सुरेश उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, उपनिरीक्षक शैलेश म्हस्के आणि त्यांच्या पथकातील गोकुळसींग कायटे, समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण व अन्य कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

या प्रकरणात अजूनही काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

# जायकासह महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई** - महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी जायका महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून ३ हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की यापूर्वी आसाम आणि तामिळनाडू सारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर, जायका आता महाराष्ट्रातही 'मेडिकल केअर सिस्टम' मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत खालील महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे, सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारणे. नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे. आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य, राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता 'स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम ॲण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून ३ हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत-जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक होईल .त्यामुळे राज्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे.एकूणच, जायका आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील ही प्रस्तावित भागीदारी आरोग्य क्षेत्रातील विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

### धार्मिक भावना दुखावणे आणि कामाच्या ठिकाणी छळ: न्यायालयाचा कठोर पवित्रा समाजासाठी आवश्यक - ॲड. महेश एस. धन्नावत

**जालना** - टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) नाशिक येथील बीपीओमधील लैंगिक छळ आणि सक्तीच्या धर्मांतराच्या गंभीर प्रकरणात, एका महत्त्वपूर्ण घडामोडीत सत्र न्यायालयाने आरोपी दानिश एजाज शेख याला अंतरिम अटकपूर्व जामीन देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. धार्मिक भावना दुखावल्याच्या एका स्वतंत्र गुन्ह्यात त्याच्यावर आरोप दाखल आहेत. अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. व्ही. काथारे यांनी मंगळवारी (दिनांक २१ एप्रिल) हा निर्णय दिला. आरोपी दानिश हा लैंगिक छळ आणि सक्तीच्या धर्मांतराच्या मुख्य प्रकरणात आधीच न्यायालयीन कोठडीत आहे. या निर्णयातून न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, धार्मिक भावना दुखावण्यासारखे गुन्हे, ज्यात समाजातील कायदा व सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता असते, अशा प्रकरणांमध्ये आरोपीला सवलत दिली जाऊ शकत नाही. न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, फिर्यादी कृष्णा माने यांनी दाखल केलेल्या प्रथम माहिती अहवालातील (एफआयआर) तपशील स्पष्टपणे दर्शवतो की, आरोपीने जाणीवपूर्वक आणि द्वेषपूर्ण हेतूने फिर्यादीच्या धर्माचा आणि धार्मिक विश्वासांचा अपमान करून त्यांच्या भावना दुखावल्या आहेत. न्यायालयाने आरोपीच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीचीही गंभीर दखल घेतली, ज्यात त्याच्यावर आधीच ८ गुन्हे दाखल असल्याचे नमूद केले आहे. न्यायाधीश काथारे यांनी अधोरेखित केले की, या गुन्ह्याचे सामाजिक परिणाम दूरगामी असून, त्यामुळे समाजातील शांतता धोक्यात येऊ शकते. प्रकरणाचा तपास अजून प्राथमिक टप्प्यात असल्याने, आरोपीला जामिनावर सोडल्यास तपासावर निश्चितपणे परिणाम होईल

# म्हसरूळ येथील समाधान शेजुळ यांची पीएसआय पदी निवडीमुळे जांगी स्वागत




**दत्ता देशमुख**

**जाफराबाद** - तालुक्यातील म्हसरूळ येथील श्री समाधान हिम्मतराव शेजुळ यांची पीएसआय पदी वर्णी लागली आहे. त्यांनी आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या जोरावर पीएसआय पदाची परीक्षा पास होऊन पीएसआय होण्याचे स्वप्न पूर्ण केले. या अगोदर महाराष्ट्र पोलीस म्हणून कार्यरत होते. ते शेतकरी कुटुंबातील ते म्हसरूळ सारख्या खेडेगावातून पीएसआय पदी निवड होणे ही एक अभिमानाची बाबत आहे. त्यांच्या या गोष्टीची दखल घेऊन म्हसरूळ येथील नागरिकांनी त्यांचा सत्कार करण्याचे ठरवले. ते माहोरा येथून येत असताना छत्रपती शिवाजी चौक माहोरा येथे फटाक्यांची आतषबाजी व गुलाल उधळून माहोरा आणि म्हसरूळ येथील नागरिकांनी त्यांचे जंगी स्वागत केले.यावेळी माहोरा येथील सरपंच श्री गजानन पाटील लहाने,बजरंग दादा बोरसे, मंगेश लहाने सरपंच म्हसरूळ, भास्कर आबा जाधव, मेहमूद भाई माहोरा,पत्रकार मुरलीधर डहाके, माजी सरपंच रविंद्र बदर तसेच माहोरा आणि म्हसरूळ येथील नागरिकांनी व महिला यांनी स्वागतासाठी खूप मोठी गर्दी केली होती. उपस्थितीत सर्वांना त्यांचे शाल देऊन स्वागत केले. तसेच म्हसरूळ येथील नागरिकांनी डीजे लावून भव्य मिरवणुक काढली होती. मुलांनी डीजे समोर नाचून आपला आनंद व्यक्त केला.

# अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन रखडले; त्वरित समायोजन प्रक्रिया राबविण्यात यावी - शेख अब्दुल रहीम

### प्रशासनाच्या दिरंगाईविरोधात १ जूनपासून आरपारची लढाई; शेख अब्दुल रहीम यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील अल्पसंख्याक खाजगी प्राथमिक शाळांमधील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे जिल्हा परिषद शाळांमध्ये समायोजन करण्यास शिक्षण विभाग जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचा आरोप होत आहे. शासनाचे स्पष्ट आदेश आणि कालमर्यादा संपूनही कार्यवाही होत नसल्याने, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनेचे राज्य प्रवक्ता तसेच हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी येत्या १ जूनपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे...

प्रशासकीय निष्क्रियतेमुळे शासनाच्या तिजोरीवर भार

निवेदनात नमूद केल्यानुसार, शासन परिपत्रक (दि. ४ फ ेब्रुवारी २०२६) अन्वये अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ३ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करणे अनिवार्य होते. मात्र, दोन महिने उलटूनही अद्याप कोणतीही हालचाल झालेली नाही. एकीकडे जिल्हा परिषदेच्या उर्दू व इतर माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

निवेदनातील प्रमुख मुद्दे

आदेशांचे उल्लंघन: शिक्षण संचालक यांच्या पत्रांना केराची टोपली दाखवली जात आहे.

वेतनाची टांगती तलवार: मे महिन्यापासून अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न गंभीर होणार असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता आहे.

विद्यार्थ्यांचे नुकसान: रिक्त पदे उपलब्ध असूनही समायोजन न केल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे.

''अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत शिक्षण विभाग केवळ कागदी घोडे नाचवत आहे. रिक्त जागा असतानाही जाणीवपूर्वक विलंब केला जात आहे. जर १ जूनपूर्वी हे समायोजन पूर्ण झाले नाही, तर आम्हाला लोकशाही मार्गाने आमरण उपोषणाशिवाय कोणताही पर्याय उरलेला नाही.''

शेख अब्दुल रहीम (राज्य प्रवक्ता, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन तथा संस्थापक अध्यक्ष हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन)

शिक्षण वर्तुळात खळबळ

या निवेदनाच्या प्रती म्हणूनही शेख अब्दुल रहीम




शिक्षण आयुक्त (पुणे), प्राथमिक शिक्षण संचालक आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनाही पाठवण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष यांनी या प्रश्नात आक्रमक भूमिका घेतल्याने शिक्षण विभागात खळबळ उडाली आहे. आता विभागीय शिक्षण उपसंचालक यावर काय पाऊल उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिल्हयातील कायद्याअंतर्गत तक्रार निवारण समित्या गठीत करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी** - कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अनुषंगाने शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग दि. १९ जुन २०१४ अन्वये प्रत्येक शासकीय / निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, रुग्णालये, खाजगी क्षेत्र, संघटना, एन्टरप्राईजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा वितरण, विक्री, यासह वाणिज्य, व्यवसाईक, शैक्षणिक संस्था, करमणूक, औद्योगिक, आरोग्य इत्यादी सेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनीट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालये, सुश्रुषागृहे, क्रिडा संस्था, प्रेक्षागृहे इत्यादी ठिकाणी सदर अधिनियमाचे कलम ६ (१) अन्वये अंतर्गत तक्रार समिती गठीत करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच महिला व बाल विकास विभागाच्या शासन निर्णय दि. १९ जुन २०१४ प्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठीत न केल्यास अथवा कायदयातील तरतुदींचे पालन न केल्यास संबंधीत अस्थापनांच्या प्रमुखावर कलम २६ नुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी आस्थापनांनी केंद्र सरकारच्या वर आपल्या आस्थापनेवर गठीत करण्यात आलेल्या समितीची नोंद करणे आणि गठीत समितीचा फलक कार्यालयाचे दर्शनी भागावर लावणे आवश्यक आहे. जिल्हयातील सर्व नोडल अधिकारी यांचे मार्फत तपासणी करून संबंधीत विभाग प्रमुखामार्फत कायदयातील तरतुदींचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. जिल्हयातील सर्व आस्थापनांनी अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करून त्यांचे नोंद वर करण्यात यावी अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जालना यांचे कार्यालयास संपर्क करण्याचे आवाहन प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# डॉ प्रकाश मांटे यांची राजपत्रित अधिकारी संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी निवड

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी (डायट) संघटनेच्या राज्य उपाध्यक्षपदी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना येथील

वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. प्रकाश मांटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सद्यस्थितीत डॉ प्रकाश मांटे हे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना येथे वरिष्ठ अधिव्याख्याता म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी डॉ प्रकाश मांटे हे वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. तेंव्हा विनाअनुदानित महाविद्यालय संघटनेमध्ये ते सक्रिय होते. छत्रपती संभाजीनगर व बुलढाणा येथे त्यांनी अधिव्याख्याता म्हणून कार्य केले आहे व वर्ग एक पदी पदोन्नतीने ते नुकतेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना येथे रूजू झाले आहेत.




नाशिक येथे दिनांक २ मे २०२६ राज्य कार्यकारिणीची निवडणूक संपन्न झाली. त्यात डॉ प्रकाश मांटे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

याबद्दल त्यांचा सत्कार डायट जालना येथील वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ प्रमोद कुमावत यांच्या हस्ते जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालना येथे करण्यात आला. यावेळी राजपत्रित अधिकारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजयकुमार शिंदे, वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अनंत चौधरी, अधिव्याख्याता डॉ. श्रीहरी दराडे, सय्यद अख्तर,भारत सूर्यवंशी, विषय सहायक विशाल सिरसाठ, संतोष मुसळे, कैलास तिडके यांची उपस्थित होती.

त्यांच्या या निवडीबद्दल डायट प्राचार्य श्रीमती सान्वी देशमुख, वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ.विक्रम सारूक, डॉ.वैशाली जहागीरदार, डॉ प्रेरणा मोरे, अधिक्षक सुनील पत्की, मिलिंद भगत, बाबासाहेब राठोड, संघपाल झिने, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य विष्णू तारगे, विजय आदनाक, इरशाद शेख, गोपाळ खोपडे, पठाण, श्रीमती सिद्दीकी आदींनी अभिनंदन केले आहे.

# गुणवंत विद्यार्थी हे महाविद्यालयाची संपत्ती आहे -प्राचार्य डॉ.राहुलजी म्हस्के



**दत्ता देशमुख**

**जाफराबाद -** येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२६ मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुलजी म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रो.डॉक्टर सुनील मेढे उपप्राचार्य डॉ. शाम सर्जे कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.विनोद हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातून कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतून प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२६ मध्ये सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ७८.११% लागला असून परीक्षेसाठी एकूण २६९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी २०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत त्यामध्ये कला शाखेचा निकाल ६१.१६% लागला असून प्रथम क्रमांकाने कुमारी रजनी मिलिंद चव्हाण ७९.८३% द्वितीय क्रमांक आदित्य पंडित साळवे ७१.३३% तृतीय क्रमांक कु.साक्षी संतोष साबळे ६५.५०% तर वाणिज्य शाखेचा एकूण निकाल ७७.३५% लागला असून प्रथम क्रमांकाने कार्तिक रामेश्वर इनामे ९४% द्वितीय क्रमांक अनस शरीफ शेख ८०.५०% तृतीय क्रमांक गणेश साहेबराव तिखे ७३% तर विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९४.४९ टक्के लागला असून प्रथम क्रमांकाने कुमारी श्रुती गजानन पाटील ७०.८३% कु.वैभवी अनिल सरकटे ,७०.८३% द्वितीय क्रमांक आशिष रवी हिवाळे ६८.३३% तृतीय क्रमांक श्रुती रवींद्र चौधरी ६५.५०% या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मा.डॉ.राहुलजी म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी डॉ.राहुलजी म्हस्के यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. राहुलजी म्हस्के म्हणाले की, गुणवंत विद्यार्थी हे महाविद्यालयाची संपत्ती असून भविष्यात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयात असलेल्या उच्चशिक्षित अनुभवी प्राध्यापक वर्ग,ग्रंथालय,प्रयोगशाळा,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र,समुपदेशन केंद्र,व्यवसाय मार्गदर्शन केंद्र,ई- लायब्ररी इत्यादी विभागाचा मोठ्या प्रमाणात वापर करून आपली गुणवत्ता वाढवून तालुक्याबरोबर महाविद्यालयाचेही नावलौकिक वाढवावे असे त्यांनी सांगितले. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के,प्राचार्य डॉ.सविता सिनगारे,वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ.सुनील मेढे,डॉ.श्याम सर्जे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.विनोद हिवराळे,प्रबंधक श्री सुनील भाऊ म्हस्के,कार्यालयीन अधीक्षक श्री प्रकाश मिरगे व तसेच कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुरेश पांडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.उत्तम वाघ यांनी केले.कार्यक्रमास कनिष्ठ विभागातील प्रा.वसुदेव म्हस्के, प्रा.सिद्धार्थ पैठणे,प्रा.भगवान गाढवे, प्रा.संदीप पंडित, प्रा.जितेंद्र वाघ, प्रा.भालचंद्र येवले, प्रा.प्रमोद राजपूत, प्रा.वाहेद पटेल, प्रा.शिवाजी वैद्य, प्रा.श्रीकृष्ण खरात, प्रा.निवृत्ती बनसोडे, तसेच वरिष्ठ विभागातील प्रा.अनिल वैद्य, प्रा.डॉ.विजय पाटील, प्रा.डॉ. संतोष पहारे, प्रा.डॉ.पंडित गडकरी, प्रा.डॉ.मदन मगरे, प्रा.बी.बी.चव्हाण, प्रा.डॉ.मोठा भाऊ मोरे यांच्यासह गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक,विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता झाली.

# जालन्यात तीन दिवशीय श्रीमद् भगवत गीता ज्ञान यज्ञ सोहळ्याचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील मंठा चौफुलीवरील प्रियंका रेसिडेन्सीमधील राजयोग भवनात ब्रह्मकुमारीज राजयोग सेवा केंद्रातर्फे ९ ते ११ मे या कालावधीत सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत राजयोगिनी नियती दीदीजी यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद् भगवत गीता ज्ञान यज्ञ आयोजित करण्यात आला आहे.



मानवी जीवनातील तणाव दूर करून मनः शांतीचा मार्ग दाखवण्यासाठी 'ईश्वरीय निमंत्रण' अंतर्गत या विशेष कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या ज्ञान यज्ञात प्रामुख्याने गीता ज्ञान, आत्मिक ज्ञान, ज्ञान-विज्ञान आणि निष्काम कर्माचा सिद्धांत यांवर सखोल प्रकाश टाकला जाणार आहे.

राजयोगिनी नियती दीदीजींना २७ वर्षांचा प्रदीर्घ आध्यात्मिक अनुभव असून, त्या गेल्या २ वर्षांपासून निरंतर १८ पुराणांचे वाचन आणि विश्लेषण करत आहेत. अविनाशी ब्रह्माचे ज्ञान आणि पुरुषोत्तम संगम युगाचे महत्त्व यावर दीदीजी विशेष संवाद साधणार आहेत. मानवी जीवन श्रेष्ठ बनवण्यासाठी आध्यात्मिक ज्ञानाची जोड देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या ज्ञान यज्ञात जालन्यातील सर्व माता-भगिनी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ईश्वरी ज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# मारोतराव देशमुख माध्यमिक विद्यालयाच्या निकालाची परंपरा कायम

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** मारोतराव देशमुख माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाने निकालाची परंपरा कायम राखत शैक्षणिक वर्ष २०२६ बारावी बोर्ड परीक्षेत बाजी मारली आहे. विज्ञान शाखेत पियूष शांताराम पाटील ८०.५० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक,तर द्वितीय दिव्या विष्णू पिंपळे हिने ६८ टक्के तर वेदिका शंकर खोत हिने ६० टक्के गुण घेत तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच कला शाखेतून रेणुका गणेश आंबिलवादे ६०.५०,पुनम ठमाजी भागवत हिने ५८.३३ टक्के तर ऋषीनाथ किसन बुरुकुल याने ५६.१७ टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक पटकावला आहे.

सदरील विद्यार्थ्यांचे कै. मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष मा. दिनकरराव देशमुख तसेच भगवान काका देशमुख यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक श्री समाधान दुनगहू,शिक्षक श्री बाळू धनवई, श्री प्रल्हाद खारतुडे, श्री विजय काठोळे यांच्यासह शाळेचे शिक्षक शिक्षेत्तर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे....

## मिशन लक्षवेध योजनेअंतर्गत प्रतिभा विकास केंद्रात खेळाडूंना आर्चरी व ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना -** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत मिशन लक्षवेध योजना ही धोरणात्मक योजना राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत आर्चरी व ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकाराकरीता जिल्हा प्रतिभा विकास केंद्र स्थापन करणे प्रस्तावित आहे. हे केंद्र कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करुन तुर्तास ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकाराची खेळाडू निवड चाचणी आयोजित करण्यात येणार आहे. खेळाडू निवड चाचणीकरीता निकष खालीलप्रमाणे वयोमर्यादा २५ वर्षाआतील मुले/मुली (वर्षाच्या ३१ डिसेंबर २०२६ रोजी), जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, मागील २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज ३ फोटो, शाळा महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र. महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक (अधिवास प्रमाणपत्र), क्रीडा कामगिरी एआयटीसए मध्ये टॉप ३ रॅंक प्लेअर असावा, नॅशनल रॅकींग प्लेअर असावा, राज्यस्तरातील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडू, गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती फिटनेस चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक. शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य. सर्व पात्र खेळाडूंनी दि. १५ मे २०२६ रोजी पर्यंत अर्ज व कागदपत्रे जिल्हा क्रीडा अधिकारी, कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत सादर करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, नरेंद्र पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया तर्फे संपूर्ण महाराष्ट्रात पक्ष्यांसाठी मातीच्या पाणपोई उपक्रमास सुरुवात

**दत्ता देशमुख**

**टेंभूर्णी -** सध्या संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र उन्हाळ्याची लाट जाणवत असून तापमानात मोठी वाढ झाली आहे. या कडक उन्हामुळे माणसांबरोबरच मुक्या पक्ष्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी पाण्याअभावी चिमण्या, कबुतरे, कावळे, साळुंकी, बुलबुल यांसारखे पक्षी तहानेने व्याकुळ होत आहेत. काही पक्ष्यांचा जीवही जात असल्याच्या घटना समोर येत आहेत. नैसर्गिक पाणवठे कमी झाल्याने ही समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. मानवाने झाडे कमी केली, जागा कमी केली, पाणी कमी केले. आणि मग आश्चर्य व्यक्त करतो की पक्षी कुठे गेले.

या पार्श्वभूमीवर युनायटेड ग्लोबल फ ेडरेशन इंडिया तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही संपूर्ण महाराष्ट्रातील विविध शहर, गाव व परिसरांमध्ये पक्ष्यांसाठी मातीची पाणपोई (मातीचे भांडे) लावण्याच्या उपक्रमास सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत झाडांखाली, सार्वजनिक ठिकाणी, शाळा परिसरात, इमारतीजवळ, उद्यानांमध्ये व पक्ष्यांची वर्दळ असलेल्या भागात मातीची भांडी ठेवून त्यात स्वच्छ पाणी भरले जात आहे.

या उपक्रमामुळे पक्ष्यांना सहज पाणी उपलब्ध होणार असून उन्हाळ्यात त्यांचा जीव वाचण्यास मोठी मदत होणार आहे. मातीच्या भांड्यातील पाणी थंड राहते, त्यामुळे पक्ष्यांना नैसर्गिक व सुरक्षित पाणी मिळते. तसेच पर्यावरण संवर्धन, जैवविविधता जपणे आणि प्राणी-पक्ष्यांप्रती दया व संवेदनशीलता वाढविण्यास हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

संस्थेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीवर, बाल्कनीत, अंगणात किंवा दुकानासमोर एक मातीचे भांडे ठेवून दररोज स्वच्छ पाणी भरावे. छोटासा प्रयत्न अनेक जीवांचे प्राण वाचवू शकतो. मोठमोठे विचार करणाऱ्यांनी कधी कधी एक वाटी पाणीही ठेवावे.

युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया ही सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था असून पर्यावरण, प्राणी संरक्षण, शिक्षण, सामाजिक मदत व जनजागृती अशा विविध क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. समाजहिताचे उपक्रम राबवून राज्यभर सकारात्मक बदल घडवण्याचे कार्य संस्था करत आहे.

युनायटेड ग्लोबल फेडरेशन इंडिया चे मॅनेजिंग डायरेक्टर दुर्गेश बनकर म्हणाले,

''माणुसकी फक्त माणसांसाठी नसते, ती प्रत्येक सजीवासाठी असते. आज एका पक्ष्याची तहान भागवली, तर उद्या निसर्ग आपल्याला आशीर्वाद देईल. प्रत्येक घरासमोर एक पाणपोई ठेवली, तर हजारो जीवांना जीवनदान मिळू शकते. समाजाने पुढे येऊन या सेवाकार्यात सहभागी व्हावे, हीच आमची अपेक्षा आहे.



# जामवाडी शिवारात उसाला भीषण आग; उभ्या पिकाची राख झाल्याने शेतकरी हवालदिल

**जालना । प्रतिनिधी -** जालना देऊळगावराजा रोडवरील जामवाडी शिवारात आज दुपारी उसाच्या शेताला लागलेल्या भीषण आगीत दोन एकर ऊस जळून खाक झाला. मे महिन्यातील वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे लागलेल्या या आगीत शेतकऱ्याचे सुमारे साडेतीन लाख रुपयांचे नुकसान झाले असून, शासनाने तातडीने मदत करावी, अशी आर्त हाक पीडित शेतकऱ्याने दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जामवाडी शिवारातील माऊली हॉटेलच्या पाठीमागे शेतकरी सुधाकर पाटीलबा वाढेकर यांचे उसाचे शेत आहे. आज बुधवार, ६ मे रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास उसाच्या शेतातून अचानक धूर निघू लागला. तीव्र उष्णता आणि वाऱ्याचा वेग जास्त असल्याने काही क्षणांतच या आगीने रौद्र रूप धारण केले. हिरवागार असलेला ऊस डोळ्यादेखत वणव्यासारखा जळू लागला.

नागरिकांची धडपड अन् अग्निशमन दलाची कामगिरी

आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. स्थानिक रहिवाशांनी बोअरवेलच्या पाईपद्वारे आणि मिळेल त्या साधनाने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीची तीव्रता एवढी मोठी होती की त्यावर नियंत्रण मिळवणे कठीण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच जालना नगरपालिकेच्या अग्निशमन दलाचा बंब घटनास्थळी दाखल झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी जवळपास एक तास अथक परिश्रम घेत पाण्याचा मारा केला आणि आग विझवण्यात यश मिळवले. मात्र, तोपर्यंत आगीने दोन एकरातील उसाचा कोळसा केला होता.

लाखोंचे नुकसान; शेतकरी संकटात

पोटच्या लेकराप्रमाणे सांभाळलेला ऊस आता कापणीला आला होता. मात्र, या आगीत दोन एकर क्षेत्रातील पूर्ण वाढ झालेला ऊस जळून खाक झाला. ''जवळपास ३ ते ३.५ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला,'' अशी भावना सुधाकर वाढेकर यांनी व्यक्त केली.

सध्या जालना जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे गेल्याने ठिकठिकाणी आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. वाढत्या उष्णतेमुळे शेतातील पाचट आणि सुक्या कचऱ्याला आग लागण्याचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर, महसूल विभागाने तातडीने जामवाडी येथील या घटनेचा पंचनामा करावा आणि बाधित शेतकऱ्याला जास्तीत जास्त शासकीय मदत द्यावी, अशी मागणी जामवाडी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.